केसीई संस्थेचे ओजस्विनी कला विभाग, डॉ.बेंडाळे महिला महाविद्यालयाचे डिझाईन ऑफ आर्ट विभाग आणि शहर महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात स्वच्छ भारत अभियानांतर्गत ७५ भिंतीवर संदेश रंगविण्यात आल्या आहेत.

सकाळी आयुक्त चंद्रकांत डांगे यांचे हस्ते उपक्रमाचे उद्घाटन झाले. आठवडाभर हा उपक्रम सुरु राहणार आहे. ७० विद्यार्थ्यांसह डॉ.बेंडाळे महाविद्यालयाचे वैशाली शिंत्रे, ओजस्विनी विभागाचे प्राचार्य अविनाश काटे, प्राजक्ता तायडे, पुरुषोत्तम घाटोळ, डीगंबर शिरसाळे, महेंद्र पाटील या शिक्षकांनी सहभाग घेतला आहे. रंगांचा खर्च मनपाने उचलला आहे.

विद्यार्थ्यानी भिंतीवर लिहिलेले संदेश पाहायला नागरिकांनी गर्दी केली होती. उपक्रमाचे शहरातील मान्यवरांनी कौतुक केले असून विद्यार्थी या कामात समरस झाले आहेत.